माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल केलेली तक्रार**

## क्र.मुमाआ/नों.क्र.२२०७४४ ते २२०७४७/२२/त.क्र.३८ ते ४१/२५

श्री.जिग्नेश शर्मा

**विरुद्ध**

जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी (इ. व का.) पी/उत्तर
बृ.मुं.म.पा. सहाय्यक आयुक्त पी/उत्तर विभाग कार्यालय इमारत
लिबर्टी गार्डन समोर, मामलेदारवाडी, मालाड (प.), मुंबई-४०० ०६४.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय कार्यकारी अभियंता पी/उत्तर विभाग
बृ.मुं.म.पा. सहाय्यक आयुक्त पी/उत्तर विभाग कार्यालय इमारत
लिबर्टी गार्डन समोर, मामलेदारवाडी, मालाड (प.), मुंबई-४०० ०६४.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २३.०९.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर तक्रारीवर आज दि. २३.०९.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान तक्रारदार, विद्यमान जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित असून तत्कालिन जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

प्रस्तुत चारही तक्रार अर्जात तक्रारदार श्री.जिग्नेश शर्मा यांना माहिती प्रदान करण्याविषयी दि.१९.०४.२०२२ रोजीच्या आदेशान्वये निर्देश देण्यात आले होते व त्यात दिलेल्या मुदतीत माहिती प्राप्त झाली नसल्याचा आक्षेप नोंदवित प्रस्तुत तक्रार अर्ज कलम १८ (१) अन्वये दि.३१ मे, २०२२ रोजी दाखल करण्यात आला होता.

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.सागर राणे यांनी उपरोक्त आदेशाचे अनुपालन झाले असून तक्रारदार यांना या आधीच माहिती पुरविण्यात आली असल्याचे नमूद केले. तथापि, आता कार्यासन बदलल्यामुळे या संदर्भातील अधिकृत दस्तऐवज त्यांच्याकडे या क्षणी उपलब्ध नसल्याचे नमूद केले आहे.

तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी आदेशाचे अनुपालन केले असल्याच्या केलेल्या कथनावर विश्वास ठेवत प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २३.०९.२०२५**

Jyotsna